# दर्जेदार पुस्तकांचा खजिना खुला

## शहरात आठ ठिकाणी 'वाचन जागर महोत्सवा'ला सुरवात

**पुणे, ता. ५ :** लोकांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने लेखक, प्रकाशक व विक्रेत्यांनी एकत्र येत साकारलेल्या 'वाचन जागर महोत्सवा'ला शनिवारपासून एकाचवेळी शहरातील आठ ठिकाणी सुरवात झाली. आठ महत्त्वाच्या प्रकाशकांकडील नामवंत लेखकांची दर्जेदार पुस्तके या महोत्सवामध्ये ठेवली आहेत. त्या दृष्टीने पहिल्याच दिवशी पुस्तकप्रेमींनी मोठ्या संख्येने महोत्सवाला भेट दिली.

डेक्कन जिमखाना येथील 'बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस'मधील 'वाचक जागर महोत्सवा'चे उद्‌घाटन 'सकाळ'चे संपादक मल्हार अरणकल्ले यांच्या हस्ते झाले. या वेळी 'बुकगंगा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, संचालक सुप्रिया लिमये, गौरी बापट उपस्थित होत्या. दरम्यान, पुस्तक पेठ (पौड रस्ता), अक्षरधारा बुक गॅलरी (बाजीराव रस्ता व कोथरूड), राजहंस (कोथरूड), मॅजेस्टिक बुक गॅलरी (म्हात्रे पूल), डायमंड पब्लिकेशन (शनिवार पेठ), शब्दांगण (महाराष्ट्र साहित्य परिषद) व रसिक साहित्य (अप्पा बळवंत चौक) येथील महोत्सवाचेही उद्‌घाटन झाले. या उपक्रमात राजहंस, रोहन, मॅजेस्टिक, मनोविकास, डायमंड, समकालीन, साधना, ज्योत्स्ना या प्रकाशकांसह पुस्तकदालनांनीही सहभाग घेतला आहे.

या प्रसंगी अरणकल्ले म्हणाले, ''वाचकांना नवीन साहित्य वाचनासाठी हवे आहे. ते काम या अभियानाद्वारे होत आहे. याबरोबरच 'ऑडिओ बुक्स'सारख्या संकल्पनेमुळे लेखनातील वेगवेगळे प्रयोग प्रत्यक्षात ऐकण्याची संधी वाचकांना मिळू लागली आहे.'' संपूर्ण पुस्तक दालनाला भेट देत नव्या-जुन्या पुस्तकांबद्दल अरणकल्ले यांनी जोगळेकर यांच्याशी चर्चा केली.

या अभियानात अच्युत गोडबोले, अनिल अवचट, विश्वास नांगरे-पाटील, वसंत लिमये, ज्ञानेश्वर मुळे, दीपा देशमुख, अतुल कहाते, विजया मेहता, सई परांजपे यांसारख्या लेखकांच्या पुस्तकांना वाचकांची पसंती मिळत आहे. 'लेखक-वाचक गप्पां'मध्ये अभिनेते व लेखक दिलीप प्रभावळकर यांच्यासह ग्रामीण भागातील लेखक, कवी सहभागी होणार आहेत. 'लेखक-वाचक गप्पा', 'भाग्यवान वाचक योजना' व सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद या महोत्सवामध्ये पुस्तकप्रेमींना घेता येणार आहे



**डेक्कन जिमखाना : 'बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस'च्या पुस्तक दालनामध्ये भरलेल्या 'वाचक जागर महोत्सवा'च्या उद्‌घाटनानंतर शनिवारी पुस्तके पाहण्यात दंग झालेले पुस्तकप्रेमी.**

### 'ऑडिओ बुक्स'लाही मागणी

**नामवंत लेखकांची गाजलेली पुस्तके ध्वनिमुद्रित केलेल्या 'ऑडिओ बुक्स'लाही तरुण, नोकरदार, ज्येष्ठ नागरिकांची मागणी वाढत आहे. 'बुकगंगा'ने ८० 'ऑडिओ बुक्स' तयार केल्या आहेत. याबरोबरच ५० लेखकांचा सहभाग असलेले 'ऑडिओ दिवाळी अंक' ५० हजार लोकांनी डाउनलोड केल्याची माहिती मंदार जोगळेकर यांनी दिली.**